शनिवार, दि. ५ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

३५ वर्षांची प्रतिक्षा संपली; आमदार लोणीकरांचे यशस्वी प्रयत्न

## क्रांतिवीर बिरसा मुंडा नगरात रोहित्र बसविले

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्रमांक ४ मधील क्रांतिवीर बिरसा मुंडा नगर (पारधी वाडा) या आदिवासी वस्तीमध्ये गेल्या ३५ वर्षांपासून स्वतंत्र वीजपुरवठ्याची प्रतीक्षा संपली आहे. लोकप्रिय आमदार बबनरावजी लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नांमुळे या भागात स्वतंत्र रोहित्र बसवण्यात आले असून, या घटनेमुळे स्थानिक आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पसरले आहे.



या भागातील रहिवाशी आणि सामाजिक कार्यकर्ते ड. सुरेश काळे यांनी वार्ड क्रमांक ४ मध्ये स्वतंत्र रोहित्र बसवण्याची मागणी आमदार लोणीकर यांच्याकडे सातत्याने लावून धरली होती. गेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान या भागात आयोजित सभेत लोणीकर यांनी येथील रहिवाशांना स्वतंत्र रोहित्र देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्या या शब्दाला जागत, त्यांनी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून हे रोहित्र बसवण्यात यश मिळवले. या रोहित्रामुळे आता या वस्तीतील प्रत्येक घरात वीजेची रोशनी पोहोचणार आहे, ज्यामुळे दैनंदिन जीवन सुसह्य होणार आहे.

क्रांतिवीर बिरसा मुंडा नगरातील रहिवाशांना गेल्या ३५ वर्षांपासून स्वतंत्र वीजपुरवठ्याची सुविधा उपलब्ध नव्हती. यामुळे या भागातील नागरिकांना अंधारात राहण्याची वेळ येत होती. स्थानिक नगर परिषद प्रशासनानेही या समस्येकडे फारसे लक्ष दिले नव्हते. मात्र, आमदार लोणीकर यांनी या समस्येची दखल घेत तातडीने उपाययोजना केल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे केवळ रोहित्रच नाही, तर आगामी काळात या भागात रस्ते, स्ट्रीट लाइट्स आणि नाल्यांची निर्मितीही होणार आहे. यामुळे या वस्तीचे संपूर्ण चित्र पालटण्याची शक्यता आहे.

रोहित्र बसवण्याच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे स्थानिक आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. आमच्या गल्लीत आता प्रकाश पडला आहे. आमदार लोणीकर यांनी आम्हाला दिलेला शब्द खरा केला, असे स्थानिक रहिवासी रामदास पारधी यांनी सांगितले.

तर, आता आमच्या मुलांना रात्री अभ्यास करता येईल, आणि घरातही विजेची सोय झाल्याने जीवन सुखकर होईल, असे सुमनबाई वाघमारे यांनी आनंद व्यक्त करत सांगितले.

आमदार लोणीकर यांनी केवळ रोहित्र बसवण्यापुरतेच थांबले नसून, या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी पावले उचलली आहेत. येत्या काही महिन्यांत या वस्तीत रस्ते, स्ट्रीट लाइट्स आणि नाल्यांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून उपेक्षित असलेल्या या भागाला विकासाची नवी दिशा मिळणार आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणे हेच माझे ध्येय आहे. या भागातील प्रत्येक व्यक्तीला मूलभूत सुविधा मिळाल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असे लोणीकर यांनी याप्रसंगी सांगितले.

आमदार लोणीकर यांच्या या प्रयत्नांमुळे परतूरमधील सर्वसामान्य नागरिकांचा त्यांच्यावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. विशेषतः आदिवासी समाज आणि पारधी वाड्यातील रहिवाशांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. आमदार लोणीकर यांनी आमच्या वस्तीला केवळ वीजच नाही, तर विकासाची आशा दिली आहे, असे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते ड. सुरेश काळे यांनी नमूद केले.

क्रांतिवीर बिरसा मुंडा नगरातील या रोहित्र बसवण्याच्या घटनेने परतूरच्या आदिवासी वस्तीला नवसंजीवनी मिळाली आहे.

आमदार बबनरावजी लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रशासकीय पाठपुराव्यामुळे ही ऐतिहासिक कामगिरी साध्य झाली आहे. आगामी काळात या भागात होणारी विकासकामे येथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत करतील. या यशस्वी प्रयत्नांमुळे परतूरच्या जनतेत आनंद आणि विश्वासाचे नवे वातावरण निर्माण झाले आहे.

शिक्षक समन्वय संघाचे शाळा बंद आंदोलन!

## आंदोलनास मराठवाडा शिक्षक संघाचा पाठींबा!

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासनादेशानुसार विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना टप्पावाढ मिळावी म्हणून ५ जुन २०२५ पासून शिक्षक समन्वय संघाचे आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. सरकार त्याची दखल घेत नसल्याने शिक्षक समन्वय संघाने ८व व ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलनाची हाक दिली आहे. मराठवाडा शिक्षक संघाने या आंदोलनास पाठींबा दिला असून शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पहाता टप्पावाढ देण्यात यावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे.



मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, एकीकडे शिक्षकांना देशाचा शिल्पकार म्हणायचे, त्यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करायचा. आदर्श शिक्षक पुरस्कार देवून त्यांचा सन्मान करायचा आणि दुसरीकडे त्याला उपाशी मारायचे. हेच का तुमचे शिक्षक प्रेम? राज्यातील कायम शब्द काढलेल्या सुमारे चार हजार विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांवर हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी गेले पाव शतक उपाशीपोटी काम करत आहे. तुम्हीच केलेले कायदे तुम्ही पाळायला तयार नाहीत. वेतन मागितले तर लाठ्या मारता वर आमच्यावरच हाफ मर्डर गुन्हे दाखल करता! तुम्हाला याची थोडी तरी शरम वाटली पाहिजे. टप्पा अनुदानासाठी ५ जून पासून राज्यातील शिक्षक आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत. यापूर्वीही पान ३ वर

युवा आदर्श

### तुतारी ...

तुतारी शोभून दिसे
वाद्य सुरेख सुषीर
लढाईला सु सज्ज
सैनिकां देती सुधीर
पंच प्राण फुंकताना
फुफ्फुसां हवा धीर
एकवटे शक्ती सारी
वादक भारी अधीर
रणशृंग रे आकर्षक
सळसळे ते रूधीर
नसनस भरे नवरस
जागृत होती बधीर
उदार होई जीवावर
हातावर घेऊन शिर
ध्वनी घुमे आसंमती
जिंकायं चालले वीर
आकडेबाजी वळण
तुतारी रे आदबशीर
उद्घाटना शुभारंभास
उधळे गुलाल अबीर
तुतारी रे आद्य वाद्य
वादक असो खंबीर
सोपे नाही वाजवणे
शिक्षण लागे गंभीर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा झाडे जगवा**

## कारळा सुरूमगाव-दिंडी मार्गाचा रस्ता पूर्ण

आमदार बबनराव लोणीकरांचे गावकऱ्यांनी मानले आभार



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील कारळा सुरूमगाव ते दिंडी मार्गापर्यंतचा रस्ता बराच काळ खराब अवस्थेत होता, ज्यामुळे स्थानिक गावकऱ्यांना प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भारतीय जनता पक्षाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यक्रमात ग्रामपंचायतीच्या आणि गावकऱ्यांच्या वतीने ही समस्या प्रभावीपणे मांडण्यात आली. यावेळी आमदार लोणीकर यांनी सहा महिन्यांत रस्ता दुरुस्तीचे ठोस आश्वासन दिले, जे त्यांनी वेळेत पूर्ण केले. हे आश्वासन पूर्ण होणे हे केवळ राजकीय वचनबद्धतेचे उदाहरण नाही, तर स्थानिक नेत्यांचे जनतेच्या समस्यांप्रती असलेले गांभीर्य आणि कृतीशीलतेचे प्रतीक आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतून विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून या रस्त्याकरिता तीन कोटी रुपये निधी मंजूर होऊन आता हा रस्ता पूर्ण झाल्याने गावकऱ्यांना प्रवासात सुलभता, सुरक्षितता आणि वेळेची बचत होणार आहे. विशेषतः ग्रामीण पान ३ वर

## ४१ ग्रामसेवकांविरोधात फौजदारीचे गुन्हे दाखल करून बडतर्फीची मागणी

संभाजी ब्रिगेड आक्रमक; जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील तब्बल ४१ ग्राम सेवकांनी खोटे ग्रामसभा ठराव सादर करून शासन व जनतेची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात संभाजी ब्रिगेड, मंठा तालुका यांच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना आक्रमक निवेदन सादर करण्यात आले. संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवश्री बाळासाहेब खवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शासन नियमानुसार ग्रामसेवकांनी मुख्यालयी वास्तव्यास असणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात एकही ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसून, उलट ग्रामसभेत खोटे ठराव सादर करून बनावट हजेरी, अपूर्ण इतिवृत्त आणि बनावट बैठकीचे दस्तावेज तयार करण्यात आले आहेत.

या बनावट ठरावांवरून शासन निधी खर्च केला गेला असून,




त्यामुळे निधीचा अपव्यय, बनावट दस्तावेज निर्मिती आणि जनतेच्या हक्कांचे उल्लंघन झाला पान ३ वर

## जिल्हा न्यायालयाची राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष मोहीम

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मोहिम देशभरामध्ये राबविण्यात येत आहे. न्यायालयातील प्रलंबित खटल्यांचा जलद निकाल, न्यायप्रक्रियेवरील येणारा ताण कमी करणे व पक्षकारांमध्ये परस्पर समजुतीने न्याय मिळवून देण्याकरिता जिल्हामध्ये १ जुलै २०२५ पासून ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत या ९० दिवसांच्या कालावधीमध्ये या विशेष मोहिमेअंतर्गत जिल्हा न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, ग्राहक तकार आयोग व तालुका स्तरीय न्यायालयामध्ये या विशेष मोहिमे अंतर्गत जास्तीत जास्त प्रकरणे मध्यस्थीच्या मध्यमातुन समजुतीने व सामंजस्याने सोडविण्यात यावे व पक्षकारांना याचा फायदा व्हावा हा यामागचा मुख्य उद्देश आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली जालना न्यायीक जिल्हा पान ३ वर

## म्हणतात ना... 'देर आये दुरुस्त आये...'





पावसाळ्यापुर्वी नाल्यांची साफसफाई महानगर पालिकेने करणे अपेक्षित असते. त्यातल्या त्यात मोठ्या नाल्यांची सफाई होणे आवश्यक असते. असे असले तरी जालना शहर महानगर पालिकेने पावसाळा सुरु झाल्यानंतर नाला सफाई करण्यास सुरुवात केली आहे. म्हणतात ना... देर आये दुरुस्त आये... (छायाचित्र - किरण खानापुरे)

# संपादकीय

## चीन-पाकचा डाव!

साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कॉपरेशन अर्थात ' सार्क' ही दक्षिण आशियाई देशांची शिखर संघटना १९८५ साली स्थापन झाली. दक्षिण आशियाई देशात सहकार्य विकसित करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दक्षिण आशियाई देशांचा दबावगट निर्माण करण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली. ही संघटना स्थापन करण्यात भारताचे मोलाचे योगदान होते किंबहुना भारताच्या पुढाकारानेच ही संघटना स्थापन झाली म्हणूनच सुरुवातीपासूनच या संघटनेवर भारताचे वर्चस्व होते. २०१५ सालापर्यंत या संघटनेची दरवर्षी सहयोगी सदस्य असलेल्या देशात शिखर परिषद आयोजित केली जायची. २०१६ साली या संघटनेची पाकिस्तान येथे शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती मात्र शिखर परिषद होण्याआधीच पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी जम्मू काश्मिरच्या उरी येथील लष्करी तळावर भ्याड हल्ला केला त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले त्या पार्श्वभूमीवर भारताने या शिखर परिषदेसाठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिला. भारताने नकार दिल्याने अन्य देशांनीही पाकिस्तानात जाण्यास नकार दिला त्यामुळे त्यावर्षी शिखर परिषद रद्द करण्यात आली. त्यानंतरही दोन्ही देशांतील संबंध तणावपूर्णच राहिले. या दरम्यान सार्क संघटनेतील बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ या देशातही मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. तेथील सरकार उलथून टाकण्यात आले. नवीन सरकारे अस्तित्वात आली त्यामुळे सार्क परिषदेची बैठक होऊ शकली नाही. आता तर सार्क संघटना मरणासन्न अवस्थेत आहे. ही संघटना असून नसल्यागत आहे त्यामुळे दक्षिण आशियाई देशांवर भारताचे जे वर्चस्व होते ते देखील कमी झाले. दक्षिण आशियामधील भारताचा प्रभाव कमी झाला याचाच फायदा चीन आणि पाकिस्तान यांनी घेण्याचे ठरवले. काही दिवसांपूर्वी चीनमधील कुणमिंग या शहरात चीन, बांगलादेश आणि पाकिस्तान या तीन देशांची त्रिपक्षीय चर्चा पार पडली. या चर्चेचा मुख्य अजेंडा होता सार्कला पर्याय देणारी नवीन संघटना उभारणे. या त्रिपक्षीय बैठकीबाबतची बातमी पाकिस्तानी आणि बांगलादेशी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली आहे. दक्षिण आशियात असलेला भारताचा प्रभाव कमी करणे. ही संघटना उभारून भारताला शह देणे हाच उद्देश ही नवी संघटना उभारण्यामागे या दोन्ही देशांचा आहे. चीन, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान या देशांचा या नव्या संघटनेत समावेश करण्याच्या हालचाली सुरू आहे. भारताला फक्त निमंत्रित सदस्य म्हणून या संघटनेत ठेवले जाणार आहे असेही या बातमीत म्हटले आहे अर्थात चीन पाकिस्तानने उभारलेल्या या संघटनेत भारत निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी होण्याची सुतराम शक्यता नाही. दक्षिण आशिया मध्ये असणारा भारताचा प्रभाव कमी करण्यासाठीच चीन आणि पाकिस्तानचा हा सर्व खटाटोप चालू आहे. त्यांना बांगलादेशचीही साथ मिळत आहे. गेल्या काही दिवसात बांगलादेश आणि भारताचे संबंध देखील बिघडले आहेत त्याचाच फायदा घेत या दोन्ही देशांनी बांगलादेशला आपल्या बाजूने वळवले आहे. केवळ बांगलादेशच नाही तर श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान यांनाही आपल्या बाजूने करून घेण्यासाठी त्यांना या संघटनेत घेतले जाणार आहे. मागील वर्षी मालदीव आणि भारताच्या संबंधात ही तणाव निर्माण झाला होता. श्रीलंकेचे विद्यमान राष्ट्रप्रमुख हे चीन धार्जिणेच आहेत. अफगाणिस्तानशी जरी भारताचे संबंध सौहादपूर्ण असले तरी तेथील तालिबानी सरकारला भारताने अजूनही अधिकृत मान्यता दिलेली नाही या पार्श्वभूमीवर या देशांना आपल्या बाजूने वळवून त्यांची एक शिखर संघटना स्थापन करण्याचा निर्णय या दोन्ही देशांनी घेतलेला दिसतोय. अर्थात भारत चीन आणि पाकिस्तानचा हा डाव ओळखून आहे. या तीन देशात झालेल्या चर्चेची भारताने गांभीर्याने नोंद घेतली असून भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताच्या शेजारी असणाऱ्या देशांना सूचक इशारा देताना म्हटले आहे की शेजारी देशांना भारताशी सहकार्य करण्याचे लाभ मिळतात आणि हे सहकार्य नाकारण्याची किंमतही चुकती करावी लागते. एस जयशंकर यांचा हा इशारा या नव्या संघटनेत सामील होणाऱ्या देशांनाच होता. भारताने या संघटनेत सामील होणाऱ्या देशांना केवळ इशारा देऊन उपयोग नाही तर त्यांना त्यांची जागाही दाखवून द्यायला हवी. भारताच्या शेजारी असलेले हे देश त्यांना गरज असताना भारताला मदतीची याचना करतात. भारताशी मैत्रीचे नाटक करतात मात्र जेव्हा त्यांची गरज संपते तेव्हा भारताला विसरून चीनच्या कच्छपी लागतात. गरज सरो वैद्य मरो अशीच भारताच्या शेजारी देशांची भूमिका असते.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## मॅट्रीकोत्तर अर्ज महाडिबीटी प्रणालीवर ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन

**जालना -** महाडीबीटी पोर्टलवरील अनु. जाती प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती अर्ज महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन सादर करण्याची सवलत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.सन २०२३-२४ व २०२४-२५ वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विद्यार्थी लॉगिनला परत पाठवण्यात आलेले आहे. अशा विद्यार्थ्यांना री अप्लाय करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ जुलै २०२५ देण्यात आलेली आहे.तसेच सन २०२५-२६ वर्षामधील अनु. जाती प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदत्रे स्कॅन करुन अर्ज नोंदविण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी महाविद्यालयांत कॅम्प आयोजित करुन जास्तीचे कर्मचारी यांची नियुक्ती करुन जास्तीत जास्त अर्ज नोंदणी होण्यासाठी कार्यवाही करावी.

# मुलांवर संस्काराची पेरणी कोण करणार?

एकेकाळी जिकडे तिकडे समाजात व गावात सुसंस्कारी वातावरण पाहायला मिळायचे. मुलांवर संस्काराची व सुविचारांची पेरणी करणारे संस्कार केंद्र म्हणून प्रत्येक घरातील आजी-आजोबांना ओळखले जायचे. घरातील लहान मुलांवर आजी-आजोबा नकळतपणे संस्काराची व सुविचारांची सुंदर पेरणी करायचे. त्यांच्या संस्कार केंद्रात मुले लहानाची मोठी होत होती. लहान मुलांवर संस्कार रुजवायला आजी-आजोबा एकदम परफेक्ट असायचे. तेव्हा संस्कार देणारी शाळा पृथ्वीतलावर कुठेच अस्तित्वात नव्हती. आणि संस्काराची पेरणी करणारे शिक्षक शोधूनही सापडत नव्हते. तेव्हा घर हे शाळा होती आणि त्या शाळेतील शिक्षक हे आजी-आजोबा असायचे आणि त्या घरातील लहान मुले हे विद्यार्थी असायचे.आणि त्या शाळेतील मुलांना शिक्षण देण्यात आजी-आजोबा फार पटाईत असायचे. मुलांवर अतिशय उत्तम व दर्जेदार शिक्षणरुपी संस्कार रुजवायचे. विद्यार्थी घडवण्यात शाळेतील शिक्षकांपेक्षा घरातील आजी-आजोबांचा मोलाचा वाटा असायचा. आजी-आजोबा मुलांच्या बालमनावर संस्काराची पेरणी करून अतिशय उत्तम प्रकारे त्यांना घडवायचे. एखाद्या लोखंडी वस्तूला हातोड्याने घडवावे तसे आजी-आजोबा मुलांना घडवायचे. म्हणजे आजी-आजोबा मुलांना घडवणारे एकप्रकारचे शिल्पकार जणू. मुलांवर कोणते संस्कार रुजवायचे? आणि व्यवहारिक जगात माणूस म्हणून कसा व्यवहार करायचा? हे आजी-आजोबांना चांगलेच ठाऊक असायचे. कारण त्यांनी आपल्यापेक्षा अधिक उन्हाळे व पावसाळे बघितलेले असायचे. त्यांचे संस्काराचे भांडार खूप मोठे व भल्या भल्या शिक्षकांना थक्क करणारे असायचे. भलेही त्यांना शाळेतील शैक्षणिक ज्ञान कमी असेल परंतु माणूस कसे बनावे? आणि समाजात माणूस म्हणून कसे वावरावे? हे त्यांना चांगलेच कळायचे. शाळेतील शिक्षक फक्त शैक्षणिक ज्ञान देतात परंतु घरातील वृद्ध आजी-आजोबा संस्काररूपी ज्ञान देतात. एक वेळ शालेय शिक्षण न घेतले तरी चालेल पण संस्काररूपी ज्ञानाची शिदोरी माणसाजवळ असणे हे फार महत्त्वाचे असते. कारण आजकाल खरा माणूस शोधणे फार अवघड झाले आहे. आणि मतलबी, स्वार्थी, भ्रष्टाचारी, कपटी आणि धूर्त माणसांचा सुळसुळाट वाढला आहे. म्हणून आजकाल माणूस बनणे काळाची गरज आहे. आणि माणसाला माणूस बनवायचे काम वृद्ध आजी-आजोबांशिवाय दुसरा कोणीही करू शकत नाही. त्यांना संस्काराची पेरणी करणारे दर्जेदार शिक्षक म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. आजी-आजोबा संस्काराची शिदोरी लहान मुलांना सढळ हाताने देतात. त्यांच्यावर कथा व गोष्टींच्या माध्यमातून संस्काराची उधळण करतात. आपल्या वागण्यातून व बोलण्यातून मुलांवर संस्काराची छाप सोडतात. मानवी जीवनात कोणासोबत कसे वागावे? कोणासोबत कसा व्यवहार करावा? याचे दर्जेदार शिक्षण आजी-आजोबांच्या छत्र छायेखाली मिळते. कोणाला कसे बोलावे? कोणासोबत कसे राहावे? माणसाची कर्तव्य कोणती? माणसाने माणसाशी कसे वागावे? वडीलधाऱ्या मंडळींना कसे बोलावे? चार माणसात गेल्यावर कसे राहावे? समाजात व गावात वावरताना कोणते नियम पाळावेत? गुरुजनांचा आदर कसा करावा? माणसासोबत व्यवहार कसा करावा? आया बहिणींचा सन्मान कसा करावा? याचे सर्व शिक्षण अतिशय अचूक व प्रभावीपणे आजी-आजोबा मुलांच्या बालमनावर रुजवतात. आणि त्यांना चांगला व सज्जन नागरिक घडवायचा प्रयत्न करतात. म्हणून तेव्हा प्रत्येक घरात आजी-आजोबांना अतिशय महत्त्व दिले जायचे. घरातील लहान मुले आई-वडिलांपेक्षा आजी-आजोबांच्या सहवासात जास्त रमायचे, त्यांच्या अंगाखांद्यावर खेळायचे, त्यांच्या सावलीत लहानाचे मोठे व्हायचे, जेवताना सुद्धा सोबत जेवायचे, आजी-आजोबा त्यांचे सर्व हट्ट पूर्ण करायचे, त्यांना जिवापाड जपायचे, त्यांना बाहेर कुठेही फिरायला न्यायचे, दुकानी नेऊन त्यांना गोळ्या बिस्कीट घेऊन द्यायचे, म्हणून मुलांना आजी-आजोबा फार आवडायचे. ते जन्मदात्या आई-वडिलांपेक्षा अधिक जीव आजी-आजोबांवर लावायचे. त्यांच्याकडे काय जादू असते? हे त्यांनाच ठाऊक! अशाप्रकारे लहान मुलांवर संस्काराची पेरणी आजी-आजोबा करायचे. पण खेदाची बाब अशी की, संस्काराची पेरणी करणारे आजी-आजोबा म्हणजेच ज्येष्ठ नागरिक आता दुर्मिळ होत चालले आहेत. आणि संस्काराची व सुविचारांची खाण आता आटत चालली आहे. आता जुनी माणसे गावोगावी क्वचित पाहायला मिळत आहेत. वृद्धांची समाधानी पिढी आता हरवत चालली आहे. त्यामुळे आजकालच्या लहान मुलांवर संस्काराची पेरणी व जडणघडण योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे आणि शाळेतील शिक्षण संस्कारक्षम न मिळाल्यामुळे मोठेपणी हीच मुले माणसासारखे न वागता हैवानासारखे वागत आहेत. मानवतेला अशोभनीय वर्तन करून माणुसकीला कलंकित करत आहेत. मनमानी व चंगळवादी जीवन जगत आहेत. मनात आले तसे मोकाट वागत आहेत. रानटी पशुप्रमाणे व्यवहार करत आहेत. कुठेही भरकटत जाऊन स्वतःला विनाशाच्या खाईत लोटत आहेत. स्वतःच्या आई-वडिलांना विसरून अलिप्त जीवन जगत आहेत. पत्नीचे ऐकून आई वडिलांना घराबाहेर काढत आहेत आणि पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगत आहेत. आई-वडिलांनी आपल्यासाठी काय केलं? आपल्याला उच्च शिक्षणासाठी किती पैसा लावला? आपल्या शिक्षणासाठी त्यांना किती संकटांना तोंड द्यावे लागले? याचा कधी विचार केलाय का आपण? नसेल केला तर विचार करून बघा, तेव्हा आपल्याला कळेल, आई-वडिलांनी आपल्यासाठी काय केले होते? आणि काय नाही केले होते? या बाबींचा विचार केल्यावर आपल्याला कळून चुकेल की, आईवडील हेच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहेत. आई-वडिलांनी आपल्यासाठी जिवापाड कष्ट व मेहनत करून उच्च शिक्षण शिकवले. चांगला अधिकारी बनवले. आणि आपण त्याच आई-वडिलांना म्हातारपणात वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत असाल तर तुमच्या एवढा दुष्ट व निर्दयी माणूस या पृथ्वीतलावर कोणीच नसेल. पत्नीचे ऐकूण तुम्ही जर आईवडिलांना वृद्धाश्रमात पाठवत असाल, तर तुम्ही जीवन न जगता आत्महत्या केलेली बरी..असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवणाऱ्या निर्दयी व दुष्ट मुलांची संख्या आता झपाट्याने वाढत आहे. म्हणूनच वृद्धाश्रमांची संख्या वाढत चालली आहे. म्हणजे त्यांना माणूस म्हणून जगायला संस्काराचा खुराक कमी पडत आहे. मुलांना संस्काराची दर्जेदार शिदोरी मिळत नसल्याने मायबापाला विसरून जात आहेत. कारण त्यांच्या बालमनावर संस्काराची योग्य पेरणी करणारी ज्येष्ठ माणसे आता दुर्मिळ झाली आहेत. म्हणून आता या कलियुगात संस्कारहीन व मानवताहीन लोकांचा सुळसुळाट झपाट्याने वाढला आहे म्हणून मुलांना सुसंस्कारी बनवणे ही काळाची गरज आहे. संस्काराची पेरणी करणारी ज्येष्ठ माणसे आता बोटावर मोजण्याइतकीच राहिली आहेत. आणि जर त्यांचाही अंत झाला तर मग मात्र संस्काराची पेरणी होणे शक्य नाही. संस्कारी पिढी जर निपजली नाही तर मग देशाचे भवितव्य धोक्यात येईल. त्यासाठी शाळेतील पुस्तकांमध्ये मुलांवर संस्कार रुजवणारे धडे शिकवणे अनिवार्य करावे. मुलांना शिक्षणाबरोबरच संस्काराची गरज आहे, याचे भान ठेवावे. आजकाल मुलांचे आई-वडिलच सुसंस्कारी नाहीत, त्यांच्यामध्ये संस्काराचा एकही गुण दिसत नाही, त्यांना संस्कार कसे असतात हेच माहीत नाही, मुलांवर संस्कार कसे टाकायचे असतात याचा पत्ता नाही, तर मग असे आईवडील आपल्या मुलांना काय संस्कार देणार? आपल्या मुलांना सुसंस्कारी व चारित्र्यवान कसे घडवणार? म्हणून हल्ली ज्येष्ठांच्या सहवासात राहून त्यांच्याकडून संस्काराचे धडे शिकावे. आणि ही थोडीफार राहिलेली ज्येष्ठ मंडळी जर कायमची मालवली तर मग संस्कार हे पाठ्यपुस्तकातून मुलांना शिकवावे लागतील. पण सध्या कोणत्याच शाळेत मुलांना पाठ्यपुस्तकांशिवाय इतर ज्ञान दिले जात नाही. केवळ पाठ्यपुस्तकातील धडे शिकवून शिक्षक मोकळे होतात. त्यांना फक्त अभ्यासक्रम शिकवायचा असतो. म्हणून शिक्षणाबरोबर मुलांवर संस्कार रुजवणारे शिक्षक दुर्मिळ झाले आहेत. अशा शिक्षकांची संख्या वाढणे नितांत गरजेचे आहे.



शिक्षकांनी शाळेत मुलांना संस्कार नाही शिकवले, आणि संस्काराचे धडे देणारी वृद्ध माणसांची पिढी नामशेष झाली, तर मला सांगा मुलांवर संस्काराची पेरणी कोण करणार?

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

आझाद हिंद सेनेच्या स्थापनादिनाच्या निमित्ताने

# देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'आझाद हिंद सेने'ची देशसेवा

आझाद हिंद सेना म्हणताच डोळ्यापुढे उभे राहतात ते देशाच्या स्वातंत्र्यासाठी जगाला गवसणी घालणारे नेताजी सुभाषचंद्र बोस ! आझाद हिंद सेना ही भारतीय पारतंत्र्याच्या काळात भारताची सेना होती. आझाद हिंद सेनेची स्थापना सुभाषचंद्र बोस यांनी दुसर्या महायुद्धाच्या काळात ५ जुलै १९४३ या दिवशी केली. ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० सहस्र भारतीय स्त्री-पुरुषांच्या सहभागाने ही सेना स्थापन केली आणि 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा' असे आवाहन केले. आझाद हिंद सेनेच्या स्थापनादिनाच्या निमित्ताने हा लेखप्रपंच

आपल्या देशाबाहेर पडून साडे तीन वर्षे उलटून गेलेल्या नेताजींना आपल्या मातृभूमीत परतायची अनिवार ओढ होती, पण त्यांना देशात प्रवेश करायचा होता तो शत्रूचा नि:पात करून व आपल्या मातृभूमीला दास्यमुक्त करून आपल्या सार्वभौम देशाचा एक सन्माननीय नागरिक म्हणून. गेली साडेतीन वर्षे केलेली अपार मेहनत व नियोजन आता फलस्वरुप होण्याची लक्षणे दिसू लागत होती, मात्र नेताजी म्हणजे दिवास्वप्न पाहणारा आशावादी मनुष्य नव्हता तर तो एक द्रष्टा होता. संपूर्ण तयारीनिशी व ताकदीनिशी हल्ला चढवुन तो निर्णायक व यशस्वी होण्याची पूर्ण खात्री झाल्यावर मगच ते आपला निर्णायक घाव घालणार होते. आणि असा निर्णायक हल्ला यशस्वी होण्यासाठी केवळ सैन्य व शस्त्रे पुरेशी नसून आपल्या देशातील बांधवांचा आपल्या प्रयत्नाला मनापासून पाठिंबा असणे आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले होते. किंबहुना जेव्हा आझाद हिंद सेना पूर्वेकडून परकिय सत्तेवर बाहेरून हल्ला चढवेल त्याच वेळी जागृत झालेली व स्वतंत्र्यासाठी सज्ज झालेली सर्वसामान्य भारतीय जनता आतून उठाव करेल व या दुहेरी पात्यांत परकियांचा निभाव लागणार नाही आणि नेमका तोच स्वातंत्र्याचा क्षण असेल हा नेताजींचा ध्येयवाद होता. मात्र यासाठी आपल्या देशवासियांना आझाद हिंद सेना ही आपली मुक्तिसेना व स्वतंत्र हिंदुस्थानचे भावी सेनादल आहे अशी भावना होणे अत्यावश्यक आहे असे नेताजींना वाटत होते. हे अत्यंत कठिण होते हेही त्यांना माहित होते.याचे कारण एकिकडे धूर्त इंग्रजांनी चालविलेला अपप्रचार आणि खोडसाळपणे आझाद हिंद सेनेचा उल्लेख अत्यंत तुच्छतापूर्वक 'जिफ्स' (जॅपनिज इन्स्पावर्ड फिफ्थ कॉलम्नीस्ट्स) असा करीत असत.त्यामुळे आझाद हिंद सेना हे जपान्यांचे हस्तक दल असुन ते जपानरूपी शत्रूला भारतावर आक्रमण करण्यास मदत करीत आहेत व त्यातुन त्यांना सत्तेची लालसा आहे असे वाटू लागेल, अर्थातच ही सेना नसून ते घरभेदी आहे असे मत तयार होईल.दुसरीकडे प्रस्थापित नेत्यांनी व काँग्रेस पक्षानेही नेताजी व आझाद हिंद सेना यांना आपले म्हणण्यास नकार दिला होता आणि युद्धात एखाद्या राष्ट्राने न्याय्य वाटणाऱ्या राष्ट्राची बाजु घेणे यांत जमीन - अस्मानाचा फरक होता. मुळात जेव्हा एखाद्या देशाचे सैन्य स्वत:चा संग्राम उभा करते आणि समविचारी राष्ट्रे त्याला पाठिंबा देतात आझाद हिंद चे हंगामी सरकार स्थापण्याचा निर्णय घेतला. इथे पुन्हा एकदा नेताजींवरील शिवचरित्राचा प्रभाव दिसुन येतो. आपले लष्कर म्हणजे कुणा लुटारूंची टोळी नव्हे, कुणा सत्ताबुभुक्षिताची फौज नव्हे,




व त्यांचा धिक्कारही केला होता.

प्रत्यक्ष आपल्या मातृभूमीत ही परिस्थिती तर जगात आपल्या सेनेचे काय स्थान असेल ? काय प्रतिमा असेल ? आपल्या देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामास जागतिक पाठिंबा मिळविणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे नेताजींनी अभ्यासले होते. इतकेच नव्हे तर आपण व आपले सेनादल हे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करीत असून या प्रयत्नात सर्व स्वातंत्र्यवादी अशियाई राष्ट्रे तसेच पाश्चिमात्य राष्ट्रे यांनी एक स्वातंत्र्योन्मुख राष्ट्र म्हणुन आपल्या मागे उभे राहिले पाहिजे ही नेताजींची महत्त्वाकांक्षा होती. एखाद्या व्यक्तिला वा संघटनेला पाठिंबा देणे वा व्यक्तिशः मदत करणे तेव्हा ते संकेताला अनुसरुन असते. आझाद हिंद सेना म्हणजे कुणी व्यक्तिगत लाभासाठी वा आपल्या ऐक्यासाठी उभारलेली मोहिम नव्हती तर ती एका संग्रामस्थ राष्ट्राची अस्मिता होती. आणि म्हणूनच तिला वा तिच्या पाठीराख्या मित्रराष्ट्रांना नेताजी बदनाम होऊ देणार नव्हते, तर ते आपला संग्राम युद्धनितीला व संकेताला अनुसरून आपला व आपल्या राष्ट्राचा हक्क मिळविण्यासाठी न्याय्य मार्गाने लढणार होते.

ज्या कारणास्तव शिवरायांनी राजमुकुटाची यत्किंचितही आसक्ती नसताना रायगडावर स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला आणि स्वराज्य स्थापनेची घोषणा केली, नेमक्या त्याच उद्देशाने नेताजींना कुणी अत्याचारी जमाव नव्हे तर हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी वचनबद्ध आणि धेयासक्त असलेले देशभक्त संघटित होऊन व स्वत:च्या भावी स्वतंत्र राष्ट्राचे प्रातिनिधीक असे सरकार स्थापून साऱ्या जगाला ग्वाही देणार होते की आम्ही आमच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आमच्या राष्ट्रध्वजाखाली आमच्या सेनानीच्या अधिपत्याखाली उपलब्ध त्या सर्व मार्गांनी आणि सहकार्यांनी लढणार आहोत आणि हा संघर्ष आता स्वातंत्र्यप्राप्तीतच विलिन होईल.

मार्च १९४५ पासून मित्रराष्ट्रांपुढे जपानची पीछेहाट होऊ लागली. ७ मे १९४५ ला जर्मनीने विनाअट शरणांगती पत्करली तर जपानने १५ ऑगस्ट या दिवशी शरणागतीची अधिकृत घोषणा केली. जपान-जर्मनीच्या या अनपेक्षित पराभवाने सुभाषचंद्रांच्या सर्व आशा मावळल्या. पुढील रणक्षेत्रासाठी सयामला जात असतांनाच १८ ऑगस्ट १९४५ रोजी फार्मोसा बेटावर त्यांचे बॉम्बर विमान कोसळून त्यांचा हदयद्रावक अंत झाला. आझाद हिंद सेनेच्या फौजा दिल्लीपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत, तरी त्या सेनेने जे प्रचंड आव्हान ब्रिटीश साम्राज्यशाहीसमोर उभे केले, त्याला इतिहासात तोड नाही. त्यामुळे ब्रिटीश सत्ता हादरली. भारतावर पुढे सत्ता गाजवणे कठीण जाईल, याची कल्पना इंग्रजांना आली. चाणाक्ष आणि धूर्त इंग्रज सरकारने भावी संकट ओळखल. पुढील मानहानी पत्करण्यापेक्षा हा देश सोडून जाण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला, अशी कबुली तत्कालीन ब्रिटीश पंतप्रधानांनी दिली होती. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या निस्वार्थ देशसेवेमुळे स्वातंत्र्यकांक्षा कोट्यवधी देशवासियांच्या मनात निर्माण झाली. नेताजींचे असीम साहस आणि तन, मन, धन यांचा त्याग केलेल्या आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना विनम्र अभिवादन !

**कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक,**
**हिंदु जनजागृती समिती,**
**संपर्क क्र.: ८२०८४४३४०१**

## पावसाळ्यातील आजार रोखण्यासाठी उपाययोजना आखण्याची महापालिकडे मागणी!

**मुंबई । प्रतिनिधी -** मे २०२५ पासून पावसाची सुरुवात झाली आहे. त्यानंतरही जून महिन्यात पावसाने हजेरी लावली. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छता विविध आजार घ्यावयाच्या दक्षता,धूर फवारणी, उघडे खाद्यपदार्थ, रस्त्यातील खड्डे, बेकादेशीर फेरीवाले,उंदीर, घुशी व भटक्या आणि कुत्र्यांपासून होणारा त्रास याकडे महानगरपालिकाच्या उत्तर विभाग यांनी तातडीने लक्षवेधावे याकरिता दि. २४ जून रोजी हॅप्पीनेस ज्येष्ठ नागरिक संघ धारावी सचिव श्री दिलीप गाडेकर यांनी सहाय्यक आयुक्त उत्तर विभाग यांना एक निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये पावसाळी आजार स्वच्छता धूर फवारणी, वस्त्यांमध्ये मेडिकल कॅम्प, बेकादेशीर फेरीवाले,शाळाबाह्य खाद्यपदार्थ विक्री तसेच उंदीर, घुशी, भटकी कुत्री यापासून संरक्षण आणि उद्भवणाऱ्या आजारापासून नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी विविध खात्याअंतर्गत संबंधित खाते प्रमुखाने सूचना देऊन भाजी मार्केट,सार्वजनिक शौचालय, खड्डे भरणे, कचरापेटी व रस्त्याची नियमित स्वच्छता उघडी गटारे जागोजागी साचलेली डेब्रिज याकडे महानगरपालिकेने वेळीच लक्ष देणे उपाययोजना केल्यास पावसाळ्यात होणाऱ्या आजारावर नियंत्रण मिळवता येईल. याकरिता स्थानिक संस्था मंडळी लोकप्रतिनिधी आणि महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी यांनी एकत्र नियोजन केल्यास किंवा बैठक आयोजित केल्यास बऱ्याचशा स्थानिक प्रश्नांची समस्यांची सोडून होऊन आजारापासून बचाव होऊ शकतो याकरिता इच्छाशक्तीचा प्रत्यक्ष कृती सत्राचा वापर व्हावा अशी विनंती वजा मागणी सचिव दिलीप गाडेकर हॅपीनेस ज्येष्ठ नागरिक संघ धारावी यांनी मागणी केली आहे याची दखल घेऊन कारवाही अपेक्षित आहे.

## अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून जमावबंदीचे आदेश

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दि. ६ जुलै २०२५ रोजी देयशयनी आषाढी एकादशी असल्याने श्री. क्षेत्र पंढरपुर येथे महाराष्ट्र राज्यातून विविध ठिकाणावरुन यात्रेसाठी पायी दिंड्या जिल्ह्यातून मार्गक्रमण करत आहेत. तसेच ६ जुलै २०२५ दरम्यान मोहरम सण साजरा करण्यात येणार आहे. दि. १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात येणार आहे. सदर सण, उत्सवाचे अनुषंगाने जालना जिल्ह्यात विविध कार्यक्रम होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक एकत्र येतात. तसेच सध्या महाराष्ट्रात राजकीय दृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकाविरुध्द आरोप प्रत्यारोप विविध कारणास्तव सुरु आहे. मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण मिळावे या मागणीसाठी तसेच शेतक-यांचे विविध मागणीसाठी विविध संघटनांकडून आत्मदहन, उपोषण, धरणे, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही. तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि. १४ जुलै २०२५ रोजीचे रात्री १२.00 वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### पान १ वरुन

## आंदोलनास मराठवाडा...

याच मागणीसाठी शेकडो आंदोलने झाली आहेत.परंतु गेंड्याची कातडी पांघरलेल्या सरकारने फक्त जिम्मेदारी ढकलण्याचे काम केले आहे. यामुळे राज्यातील शिक्षकांमधे तीव्र असंतोष, संताप आणि चीड निर्माण झाली आहे. याचा परिपाक म्हणून शिक्षक समन्वय संघाने दोन दिवशीय शाळा बंद आंदोलनाची हाक दिली आहे. मराठवाडा शिक्षक संघाने या आंदोलनास पाठींबा दिला आहे. टप्पावाढ न देण्यात आल्यास बेमुदत शाळा बंद आंदोलनाचा ईशारा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे,कोषाध्यक्ष ए बी अवताडे, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवंते, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रेमदास राठोड,आरेफ कुरेशी,कार्याध्यक्ष फरखुंद अली सय्यद, कोषाध्यक्ष नारायण मुंडे,उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, जगन वाघमोडे, सहसचिव गणेश चव्हाण,प्रद्युम्न काकड,दीपक शेरे,सदस्य तुकाराम पडघन, तालुकाध्यक्ष रमेश गाढे,आनंद वाघ, शिवहारी कायंदे, विजय कुमार खरात,सुनील म्हस्के, बि डी शेख, युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, महिला शहराध्यक्ष ज्योती पांगारकर, तालुकाध्यक्ष गणेश मेहेत्रे,जनार्दन कुदर सुरेश बनकर, राधेश्याम चौधरी, संजय चव्हाण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिला आहे.

## कारळा-सुरुमगाव ...

भागात चांगल्या रस्त्यांचा थेट परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर, शेती उत्पादनांच्या वाहतुकीवर आणि दैनंदिन जीवनावर होतो. गावकऱ्यांनी बबनराव लोणीकर यांचे आभार मानले असून, यातून त्यांच्यावरील विश्वास आणि त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक दिसून येते. अशा पायाभूत सुविधांच्या विकासामुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत होते आणि स्थानिक नेतृत्वाची विश्वासार्हता वाढते. हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण झाल्याबद्दल बबनराव लोणीकर यांचे आभार मानत अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातही अशा विकासकामांना गती मिळावी अशी अपेक्षा गावकरी व्यक्त करीत आहे.

## ४१ ग्रामसेवकांविरोधात ...

आहे. त्याचबरोबर, हे ठराव माहिती अधिकार अंतर्गत मागवूनही संबंधित ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व गटविकास अधिकारी सत्यप्रती देण्यास टाळाटाळ करत आहेत. यावरून हा भ्रष्टाचार लपवण्याचा संगनमताचा कट असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. माहिती लपवणाऱ्या अधिकाऱ्यांवर RTI अंतर्गत कारवाईची मागणी संभाजी ब्रिगेडने मागणी करूनही ग्रामसभा ठराव, हजेरीपत्रक व इतिवृत्त यांची सत्यप्रती देण्यास संबंधित ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व पंचायत कर्मचारी टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे यामध्ये संगनमत असून, माहिती अधिकार कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

**शिस्तभंग प्रस्ताव वर्षभर प्रलंबित - प्रशासन 'बघ्याची भूमिका'**

संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, पंचायत समितीसमोर सलग २३ दिवस आंदोलन करण्यात आले होते, त्यात १० ग्रामसेवक व विस्तार अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंगाचे प्रस्ताव पाठवण्यात आले होते. मात्र आजपर्यंत एकाही अधिकाऱ्याविरोधात ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने भ्रष्ट कर्मचाऱ्यांना संरक्षण दिल्याचे चित्र स्पष्ट होते, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

संभाजी ब्रिगेडच्या ठोस मागण्या केल्या आहेत यात मुख्यालयी नसून खोटे ठराव सादर करणाऱ्या ४१ ग्रामसेवकांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करावेत., अशा ग्रामसेवकांना निलंबित करून बडतर्फ करण्याची प्रक्रिया सुरू करावी. चौकशी न करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांना निलंबित करून सेवा नोंदीत गंभीर टीका नोंदवावी. गटविकास अधिकाऱ्यांची जबाबदारी ठरवून त्यांच्यावर चौकशी व्हावी., ग्रामसभा ठराव, हजेरी व इतिवृत्त जनतेसमोर सादर करून सत्यप्रती द्याव्यात., अभिलेख लपवणाऱ्या ४१ ग्रामसेवकांवर ठढख अंतर्गत कठोर कार्यवाही व्हावी., संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून अहवाल जनतेसमोर जाहीर करावा. आदी मागण्यांचा समावेश आहे. मागण्या दुर्लक्षित केल्या, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलनाचा ईशारा संभाजी बिग्रेडच्यावतीने निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

## जिल्हा न्यायालयाची ...

राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मध्यस्थी मोहिम १ जुलै २०२५ पासुन प्रभाव पिणे राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत न्यायालयातील प्रलंबित असलेले मोटार अपघात भरपाई प्रकरणे, वैवाहिक वाद, कौटुंबिक हिंसाचार प्रकरणे, धनादेश न भरण्याचे प्रकरणे व्यावसायिक वाद प्रकरणे, सेवाविषयक वाद प्रकरणे, तडजोड पात्र फौजदारी प्रकरणे, ग्राहक तकार मंचाकडील प्रकरणे, कर्ज वसुली प्रकरणे, जमीन मालमत्ता वाटप प्रकरणे, घरमालक व भाडेकरू वाद प्रकरणे, जमीन संपादन प्रकरणे तसेच इतर नागरी प्रकरणे मध्यस्थीसाठी ठेवले जाऊ शकतात. अशी माहिती जिल्हा विधीसेवा प्राधिकारण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## कॅन्सर व्हॅनद्वारे कर्करोग तपासणी शिबीरांचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** कॅन्सर व्हॅन जालना जिल्हयामध्ये दि.१ जुलै २०२५ते ३१ जुलै २०२५ पर्यंत विविध ठिकाणी भेट देऊन कर्करोग निदान, तपासण्यासाठी पाठपुरावा करण्यांत येणार आहे. सदरील मोहिम गाव पातळी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा स्तरापर्यंत राबविण्यांत येणार आहे.

सदरील मोहिमे मध्ये, वैद्यकिय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, डेंन्टीस्ट यांच्या मार्फत तपासणी करण्यांत येणार आहे. आरोग्य कर्मचारी व आशा सक्रीय सहभाग घेतील. आवाहन :-जिल्हयातील ३० वर्षावरील पुरुष/स्त्री यांनी तपासणी करुन घ्यावी. यामध्ये मौखिक, स्तन व गर्भाशयमुख कर्करोगाची तपासणी करण्यात येणार आहे.

सदरील व्हॅन द्वारे कर्करोगाबाबत लवकर निदान होणे, प्रतिबंध करणे, उपचार व जीवनशैलीचा वापर इत्यादी विषयी जनजागृती करणे हे उदिद्ष्ट आहे. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक



उदिद् ष्ट कर्करोगाचे प्रमाण व मृत्यू कमी करणे असुन कर्करोगापासुन बचाव कसा करावा या बाबतची माहिति बाबत जनजागृती करण्याचे उदिद्ष्ट आहे. मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोगाचे प्रमाण जास्त असल्याने या अनुषगांने खालील प्रमाणे गांवनिहाय कॅन्सर तपासणी होणार आहे.

## भगवान विठ्ठल ब्रम्हांडाचे पालनहार

पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे.त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत. परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या) रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या ह्रुदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक, वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते. कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे.त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात.एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन एकादशी देवता उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय.या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८४ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली. अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे.आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले.याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी,सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल.त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!





**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

## वाहनांनी योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करुन घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** चालु शैक्षणिक वर्षात अधिकृतपणे विद्यार्थी वाहतूक करणारे वाहने, स्कूल बसेस इत्यादी वाहनांची योग्यता प्रमाणपत्र, परवाना, विमा, पियुसी, वाहनकर, चालक अनुज्ञप्ती (ड्राव्हिंग लायसन) इत्यादीची विधी ग्राह्यता स्कूल बस कमिटी तसेच शाळा प्रशासनातर्फे तपासून घ्यावे.

तसेच योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण झाले नसल्यास तात्काळ वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण (फिटनेस सर्टीफिकेट रिन्युव्हल) करावे, कोणत्याही परिस्थितीत योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण संपलेल्या वाहनांमध्ये विद्यार्थी वाहतूक होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## डॉ. राजशेखर बालेकर यांचा सत्कार




**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय धोरण समितीवर सदस्य म्हणून ग्रंथालय भारतीचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. राजशेखर बालेकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशन-जालना, ग्रंथालय भारती-जालना व ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय-जालना यांच्यावतीने सत्काराचे आयोजन श्रीराम वाचनालय-जालना येथे (दि.0४) करण्यात आले होते.

याप्रसंगी व्यासपीठावर सत्कारमुर्ती डॉ. राजशेखर बालेकर तर प्रमुख पाहूणे म्हणून जिल्हा अध्यक्ष भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चा जिल्हा जालनाच्या संध्या देठे, ग्रंथालय भारतीचे उपाध्यक्ष रमेश देहडकर, जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डी. बी. देशपांडे यांची उपस्थिती होती.

संध्या देठे मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या की, डॉ. बालेकर हे अभ्यासू व्यक्तिमत्व आहे. राज्य शासनाच्या ग्रंथालय धोरण निवड समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती झाल्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांच्या अडी-अडचणी ह्या शासनाकडे मांडण्यासाठी त्यांना अधिकार प्राप्त झाला असल्याने ते महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयासाठी आनंदाची गोष्ट आहे.

सत्काराला उत्तर देतांना डॉ. बालेकर म्हणाले की, सन २०१४ पासून ग्रंथालय धोरण निश्चित करण्यासाठी समिती नेमावी यासाठी ग्रंथालय भारतीच्या मार्फत पाठपुरावा सुरु होता त्याला आता यश मिळाले. एकदा एखादे धोरण निश्चित झाले तर त्याप्रमाणे कार्य करणे हे शासनाला बंधन कारक असते. ग्रंथालय समितीवर असलेल्या इतर तज्ज्ञ सदस्यांचा अनुभवाचा देखिल ग्रंथालय धोरण ठरविण्यासाठी फायदा होईल. ग्रंथालय भारतीच्या माध्यमातून ग्रंथालय कायदा दुरस्ती करण्यास यश मिळाले असून तो कायदा एक जानेवारी पासून आमलात आला आहे.देविदास जिगे, डी.बी.देशपांडे, रमेश देहडकर यांनी डॉ. बालेकरांचे अभिनंदन करत आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगांवकर यांनी तर उपस्थितांचे आभार श्रीकांत काळे यांनी मानले. याप्रसंगी प्रवीण देशपांडे,शैलेंद्र बदनापूरकर, रत्नाकर नंद, रावसाहेब अंभोरे, नंदकुमार सानप, काशिनाथ गायकवाड, कान्तराव डांगे, नंदकुमार कुलकर्णी, सुखदेव उघडे, राजेश चव्हाण,मुकुंदा खंदारे, संजय शिंदे, नंदकुमार मुर्गे, शकुंतला शेलगावकर, सखाराम बोरूळ, नंदा शेलगावकर, नितीन बावणे,अभिजीत शेंडगे, कीर्ती शेलगावकर यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# अखिल भारतीय अग्रवाल महासभा महिला विभागाच्यावतीने वृक्षारोपण

**जालना | प्रतिनिधी -** आषाढी एकादशीनिमित्त अखिल भारतीय अग्रवाल महासभा महिला विभागाच्यावतीने एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत या दिवशी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला तसेच एका गरजू महिलेस तिच्या मुलीच्या उपचारांसाठी आर्थिक मदत देण्यात आली.

या उपक्रमात सहभागी झालेल्या महिलांनी एकत्र येत जालना परिसरात विविध ठिकाणी वृक्षारोपण केले. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर निसर्गरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी पर्यावरण संतुलनासाठी अधिकाधिक झाडे लावण्याचा निर्धार व्यक्त केला. याच कार्यक्रमात एका गरजू महिलेची वेदनादायक कहाणी समजली. तिच्या मुलीला रक्ताची तीव्र कमतरता असून योग्य उपचार न मिळाल्यास तिचे आरोग्य अधिक बिघडू शकते, याची जाणीव झाल्यावर, महिला विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत आर्थिक मदतीचा हात पुढे करत तिला उपचारासाठी रक्कम दिली. समाजातील गरजूंसाठी अशा प्रकारे मदतीचा हात पुढे करणे हीच खरी सेवा असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



या कार्यक्रमात महिला विभागाच्या प्रांतीय अध्यक्ष सीमा पंच, अनिता पित्ती, संतोष बगडिया, पूनम अग्रवाल, ज्योती अग्रवाल, शीतल धानवाला, कोमल अग्रवाल, जया भरतिया, सरला अग्रवाल, सुषमा अग्रवाल, शुभा अग्रवाल, मीना अग्रवाल, रीटा भरतिया, नैना अग्रवाल, सुनीता गोयल, दीपिका देवीदान, प्रियांका कामड, वंदना गुप्ता, शोभा पित्ती, प्रीती अग्रवाल, रुचि अग्रवाल, पारुल गुप्ता, राधिका गिंदोडिया, राजकुमारी गुप्ता, राखी अग्रवाल, रश्मी बगडिया, रश्मी भरतिया, रश्मी अग्रवाल, रेणु गुप्ता, रेणुका गोयल यांची उपस्थिती होती. यावेळी दित्य तुषार बगडिया याने श्री विठ्ठलाची तर आरुषी अग्रवाल हिने रुक्मिणीची वेशभूषा केली होती. विठ्ठल-रुक्मिणीचा हा देखावा अत्यंत लक्षवेधी ठरला.

# रोटरी क्लब जालना इलाईटच्या अध्यक्षपदी उमेश बजाज तर सचिवपदी शरद गादिया

## पदग्रहण सोहळा थाटात संपन्न

**जालना | प्रतिनिधी -** सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे नूतन अध्यक्ष उमेश बजाज, सचिव शरद गादिया आणि कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा गुरुवार दि. ३ जुलै रोजी हॉटेल सेफ्रानमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

अध्यक्षस्थानी माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक प्रांतपाल संजय राठी यांची उपस्थिती होती. प्रारंभी नूतन अध्यक्ष उमेश बजाज यांनी मावळते अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल यांच्याकडून तर नूतन सचिव शरद गादिया यांनी मावळत्या सचिव अनया अग्रवाल यांच्याकडून पदभार स्वीकारला.



याप्रसंगी नूतन कार्यकारिणीचे राजेंद्र अग्रवाल, अनया अग्रवाल, गणेश बाले, विजयालक्ष्मी बाले, रवींद्र हुसे, गिरधर लधानी, डॉ. प्रल्हाद उढान, विनोद बरवार, कैलास शिंदे, संगीता गादिया, प्रदीप भारजवाल, श्रीकांत दाड, जितेंद्र गर्ग, रुक्मिणीकांत दीक्षित यांच्यासह नवीन सदस्यत्व स्वीकारलेल्या स्मिता चेचानी, अनिता सैबी, विनोद देशमुख, सुनिता देशमुख, रत्नप्रभा उढान यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. साबू म्हणाले की, प्रत्येक वर्षी या क्लबची सदस्यवृद्धी होत असून, नूतन अध्यक्ष उमेश बजाज यांच्या नेतृत्वाखालील कार्यकारणी उपलब्ध निश्चितच नव्या उंचीवर पोहोचवेल. सहाय्यक प्रांतपाल संजय राठी यांनी प्रांतपाल सुधीर लातूरे यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविला.

यावेळी मावळते अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल आणि मावळत्या सचिव अनया अग्रवाल यांनी त्यांच्या कार्यकाळात वर्षभर राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात अनिता सैबी यांच्या गणेश वंदनेने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता गादिया आणि रवींद्र हुसे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार शरद गादीया यांनी मानले. या कार्यक्रमाला रोटरीचे संस्थापक सदस्य फुलचंद भक्कड, राम किशन मुंदडा, वेणूगोपाल राव, रोटरी क्लबच्या अध्यक्ष वर्षा पित्ती, डॉ. विजय जेथलिया, डॉ. सुमित्रा गादीया, प्रमोद झांजरी, निर्मला साबू, संजय दाड, विष्णू चेचानी, डॉ. दीपक बगडिया, मुकेश अग्रवाल, पंकज लड्ढा, डॉ. प्रतिभा श्रीपत, अंकित अग्रवाल, डॉ. अभय सोनी, स्मिता भक्कड, स्वप्निल बडजाते, महिंद्रा सेहगल, विवेक मणियार, डॉ. आशुतोष सोनी, संजय लोहिया, विजय राठी यांच्यासह रोटरी परिवारातील सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### शहरात जलपुनर्भरण प्रकल्प राबविण्यात येणार-उमेश बजाज

नूतन अध्यक्ष उमेश बजाज म्हणाले की, गरजेनुसार विविध प्रकल्प हाती घेतले जातील. विशेष करून पडणाऱ्या प्रत्येक पावसाचा थेंब जमिनीत जिरविण्यासाठी जलपुनर्भरण प्रकल्प राबविला जाणार आहे. त्याची सुरुवात सर्व सदस्य आपले घर आणि प्रतिष्ठानचे जलपुनर्भरण करून करतील. नैसर्गिक वस्तूंचा वापर, हरितगृह प्रकल्प यासह सामाजिक, आरोग्य, शिक्षण, पर्यावरणविषयक उपक्रम राबविण्याला प्राधान्य दिले जाणार असून, यासाठी शहरातील रोटरी परिवारातील सहाशे सदस्यांचे सहकार्य घेऊन या उपक्रमांना यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे ते म्हणाले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.